# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 205/2022 दिनांक : 20.05.2022

## 1)खुनः—

**मनाठा :—**दिनांक 18.05.2022 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, **मौजे पळसा शिवारातील मयत महिलेच्या शेतामध्ये ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे ललिताबाई वसंत उमरकर, वय 45 वर्षे, रा. पळसा ता. हदगाव जि. नांदेड**, हि शेतात गेली परंतु संध्याकाळी 07.30 वा. पर्यंत परत आली नसल्याने फिर्यादीने मयत महिलेचा शोध घेतला असता मयत महिलेचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी तिचा गळा आवळुन खुन करुन तीची बॉडी पाण्यात टाकुन दिली. वगैरे **फिर्यादी गोपाल उत्तमराव उमरकर, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. पळसा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरन 95/2022 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चव्हाण, मो.नं. 9767747774** हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 15.05.2022 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **पुलाचे अलिकडे रोडवर पुणेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन आमच्या चुलत्याच्या विरोधात ग्रामपंचायतला पॅनल उभा करुन सरपंच झाला या कारणावरुन यातील आरोपीतांनी फिर्यादीचा भाऊ संदिप व मित्र धनंजय भोसले यांना लोखंडी रॉडने, काठीने डोक्यात मिरची पावडर टाकुन मारहाण करीत असताना त्यावेळी फिर्यादी तेथे गेला असता आरोपीतांनी तु आमच्या चुलत्याच्या विरोधात ग्रामपंचायतला पॅनल उभा करुन सरपंच झालास काय तुला खतम करतो म्हणुन लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोक्यात मारला असता तो घाव फिर्यादीने वाचवण्यासाठी हात वर केला तो घाव त्याच्या डाव्या हातावर लागल्याने हात फॅक्चर झाला तसेच फिर्यादीस काठीने लोखंडी रॉडने डोक्यात मारुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी हनुमंत संभाजीराव पुयड, वय 26 वर्षे, व्यवसाय शेती रा. पुणेगाव ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 298/2022 कलम 307,326,34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री सुरेश थोरात, मो. नं. 9823298315** हे करीत आहेत.

## 3)जबरी चोरी :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 19.05.2022 रोजी चे 04.30 वा. चे सुमारास, **कलामंदिर बस स्थानक ओव्हर ब्रिज खाली रस्त्यावर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार हे नौकरीच्या शोधासाठी बेंगलोर येथे जाण्यासाठी रात्री रेल्वेस्टेशन येथे रात्रभर मुक्कामी थांबले असताना रस्त्यात यातील नमुद एकुण चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस अडवुन फायटर चा धाक दाखवुन थापडांनी व दगडाने मारहाण करुन दोन मोबाईल व नगदी असे एकुण 8380/— रुपयाचा माल जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी प्रविण किशन पावडे, वय 28 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. आंबोडा ता. महागाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 168/2022 कलम 394,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री प्रविण आगलावे, मो.क्रं. 9890630130** हे करीत आहेत.

**2)मरखेल :—** दिनांक 24.04.2022 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **मौजे मरतोळी गावात रोडवर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तू आमच्यावर केलेली फौजदारी कार्यवाही मागे घे म्हणुन कत्तीने मारहाण करुन फिर्यादीचे हातातील सोन्याची अंगठी व नगदी असा एकुण 38,000/— रुपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सन्मुख ज्ञानदेव सुकनाळे, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. मरतोळी ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 89/2022 कलम 394,392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री नामदेव शिवाजी मद्दे, मो.क्रं. 9049918000** हे करीत आहेत.

## 4)चोरी :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 19.05.2022 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **मातोश्री मंगल कार्यालय व माहेश्वरी भवन मंगल कार्यालयाचे मध्यभागी रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्कुटी क्रं. एमएच—26/बीके—2580 किमती 30,000/—रुपयाची व व्हीवो कंपनीचा मोबाईल किंमती 29000/— रुपयाचा व नगदी 10000/— रुपये असा एकुण 69000/— रुपयाचा माल नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी शेख अमजद शेख निजाम, वय 27 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पिरबुन्हाण नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 297/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.क्र. 9158762002** हे करीत आहेत.

## 5)मो. सा. चोरी :–

**लोहा :–** दिनांक 14.05.2022 रोजी चे 12.15 वा. ते 14.45 वा. चे दरम्यान, **लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा कंपनीची काळया रंगाची मो.सा. क्रं. एमएच–26/इ–5759 किमती 10,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी खोबराजी गोविंद माडगे, वय 48 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. आंडगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 109/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री बागडे, मो.क्र. 7775901279** हे करीत आहेत.

## 6)गंभीर दुखापत :–

**1)हदगाव :–**दिनांक 17.05.2022 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोर मौजे निवळा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीने टॅक्टर नांगरनीचे पैसे मागीतल्याचे कारणावरुन फिर्यादीस व त्यांचे आईस शिवीगाळ करुन लोखंडी रॉडने, लाथा बुक्याने मारहाण करुन हात मोडुन गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी विठ्ठल किशनराव कोकाटे वय 19 वर्षे, व्यवसाय शेती रा. निवळा ता. हदगाव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरन 158/2022 कलम 326,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री चोपडे, मो. नं. 9049487708** हे करीत आहेत.

**2)लोहा :–**दिनांक 19.05.2022 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर मौजे खडक मांजरी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी गैरकायादयाची मंडळी जमवुन फिर्यादीस व फिर्यादीचे भावास लोखंडी रॉडने डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली व फिर्यादीचे वडीलास डाव्या हाताच्या मनगटावर व पाठीवर लाकडी काठीने मारहाण करुन डाव्या हाताचा पंजा फॅक्चर केला व गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी राजकुमार बालाजी पिल्लोळे वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. खडक मांजरी ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 110/2022 कलम 326,324,323,143,148,149,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/2325 किरपने, मो. नं. 9881708474** हे करीत आहेत.

## 7) आत्महत्येस प्रवृत केले :–

**मुखेड :–** दिनांक 18.05.2022 रोजी 07.30 वा. चे सुमारास, **राहते घरी मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची **मुलगी मयत नामे गीतांजली शिवाजी ताटे वय 20 वर्षे व्यवसाय घरकाम रा. विठ्ठलमंदीर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** हिस यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन नविन कटलरीचे दुकान टाकण्यासाठी माहेरहुन दोन लाख रुपये घेवून ये म्हणुन अपनास्पद वागणुक देवून तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केल्याने त्यांनी दिलेल्या त्रासाला कंटाळुन मयत हिने गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **फिर्यादी बालाजी पुरभाजी वसुरे वय 42 वर्षे व्यवसाय मजुरी रा. मेंडका ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 154/2022 कलम 306,304(ब),498(अ),323,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री काळे, मो.क्रं. 9850072078** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**मरखेल :–** दिनांक 19.05.2022 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **मौजे लोणी ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी दारू व देशी दारु भिंगरी संत्रा असे एकुण किंमती 1940/–रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/526 राजु चांदु वाघमारे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 88/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/526 वाघमारे, मो.क्र. 9823144893** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 206/2022 दिनांक : 20.05.2022

**पोलीस अधिक्षक मा. श्री प्रमोद शेवाळे साहेबांनी घेतली दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची शपथ**

आज दिनांक 20 मे 2022 रोजी 11.00 वा. चे सुमारास पोलीस अधिक्षक कार्यालयात **पोलीस अधिक्षक मा. श्री प्रमोद शेवाळे साहेबांनी** दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस असल्यामुळे शपथेचे वाचन केले. तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पण पाठोपाठ शपथेचे वाचन केले. **"आम्ही भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरे विषयी दृढ निष्ठा बाळगुन याव्दारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करण्याची गांभर्यपुर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू वर्धिष्णू करु, तसे मानवी जिवीत मुल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तिचा प्रतिकार करु"** अशा प्रकारची शपथ घेण्यात आली.

या प्रसंगी पोनि/श्री प्रशांत देशपांडे,जिवीशा, पोनि/श्री पवार, पोलीस नियंत्रण कक्ष, सपोनि/श्री शिवाजी लष्करे, जनसंपर्क अधिकारी, सपोनि/श्री बहात्तरे, पोलीस नियंत्रण कक्ष, वाचक शाखा, इतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार व कार्यालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



